ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 01 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## भारतीय वंशाच्या स्मित मच्छार यांच्यामुळे वाचले 180 इस्रायली प्रवाशांचे प्राण





पान 2 वरुन...

कात्रज-कोंढवा रस्त्याच्या कामाला वेग

### ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात विरोधक एकवटले; पाच आंदोलनांची घोषणा

# निवडणूक आयोगाविरोधात देशभर आंदोलने

महाईन्यूज I नवी दिल्ली

**निवडणूक आयोगाच्या विशेष सघन पुनरीक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेसह आयोगाच्या कारभारावरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीने आंदोलनाची व्यापक रणनीती जाहीर केली आहे. बुधवारी (३० सप्टेंबर) नवी दिल्ली येथे झालेल्या आघाडीच्या बैठकीनंतर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आंदोलनाच्या विविध टप्प्यांची माहिती दिली. त्यानुसार २ ते ८ ऑक्टोबरदरम्यान देशभरातील जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर ‘लोकशाही बचाव’ पदयात्रा व निदर्शने करण्यात येणार असून, ६ ऑक्टोबर रोजी विरोधी पक्षांचे खासदार निवडणूक आयोगावर मोर्चा काढणार आहेत.**




खरगे यांनी सांगितले की, जिल्हास्तरावरील आंदोलनात इंडिया आघाडीतील पक्षांसह नागरी संस्था आणि समान विचारांच्या घटकांना सहभागी करून घेतले जाणार आहे. या माध्यमातून निवडणूक प्रक्रियेबाबत विरोधकांनी उपस्थित केलेले प्रश्न जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर निदर्शने करण्यात येणार आहेत.

दरम्यान, ६ ऑक्टोबर रोजी सर्व विरोधी पक्षांचे खासदार एकत्रितपणे निवडणूक आयोगाकडे मोर्चा काढतील. यापूर्वीच मोर्चा काढण्याचा विचार होता; मात्र अधिकाधिक खासदारांच्या सहभागासाठी ही तारीख निश्चित करण्यात आल्याचे खरगे यांनी सांगितले. एसआयआर आणि मतदार यादीतील बदलांबाबत विरोधी पक्षांकडून सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

या आंदोलनाच्या पुढील टप्प्यात विरोधी पक्षांचे नेते ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेण्याचा प्रयत्न करणार आहेत. निवडणूक प्रक्रिया आणि घटनात्मक संस्थांबाबत उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर राष्ट्रपतींकडे निवेदन देण्याची भूमिका विरोधकांनी मांडली आहे.

इंडिया आघाडीने ऑक्टोबर आणि नोव्हेंबरमध्ये देशातील विविध भागांत पाच मोठ्या सभा घेण्याचीही घोषणा केली आहे. या सभांची ठिकाणे आणि तारखा नंतर निश्चित करण्यात येणार आहेत.

आंदोलनाचा पुढील महत्त्वाचा टप्पा म्हणून १ नोव्हेंबर रोजी नवी दिल्लीत ‘लोकशाही बचाव’ची मोठी सभा घेण्याचे आघाडीने जाहीर केले आहे.

निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर आणि एसआयआर प्रक्रियेवर विरोधकांकडून गंभीर आक्षेप नोंदवले जात आहेत. दुसरीकडे, निवडणूक आयोगाने मतदार यादीतील प्रक्रियेबाबत कायदेशीर नियमांनुसार कार्यवाही होत असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आगामी काळात निवडणूक प्रक्रिया, मतदार याद्या आणि आयोगाच्या भूमिकेवरून राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

### १ नोव्हेंबरला दिल्लीत मोर्चा

इंडिया आघाडीच्या महत्त्वाच्या बैठकीत निवडणूक आयोगाविरोधात देशभरात वेगवेगळ्या टप्प्यात आंदोलन करण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच पुढील एका महिन्यात देशभरातील पाच मोठ्या शहरात मोर्चे काढून १ नोव्हेंबरला दिल्लीत भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहितीही विरोधकांनी सांगितली आहे.

### सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर निदर्शने

इंडिया आघाडीच्या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं की, इंडिया आघाडीच्यावतीने २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर या कालावधीत देशभरातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर निदर्शने करण्यात येतील. “२ ते ८ ऑक्टोबर दरम्यान आम्ही जिल्हास्तरावर ‘लोकशाही वाचवा’ पदयात्रा काढणार आहोत. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाबाहेर निदर्शने करणार आहोत. आम्ही ही मोहीम का राबवत आहोत याबद्दलही जनतेत जनजागृती करणार आहोत”, अशी माहिती खरगे यांनी सांगितली.

# कात्रज-कोंढवा रस्त्याच्या कामाला वेग

## ५० मीटर रुंदीकरण मार्चमध्ये पूर्ण; उर्वरित काम २०२८ पर्यंत करण्याचे उद्दिष्ट

**महाईन्यूज । पुणे / कात्रज**

**पुणे शहरातील बहुचर्चित कात्रज-कोंढवा रस्त्याच्या ५० मीटर रुंदीकरणाचे काम येत्या मार्चमध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच कात्रज चौकातील उड्डाणपुलाचे काम डिसेंबर २०२६ अखेर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी कात्रज-कोंढवा रस्ता आणि कात्रज चौकातील उड्डाणपुलाच्या कामाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.**



यावेळी विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर, सभागृह नेते गणेश बिडकर, प्रकल्प विभागाचे अधिकारी दिनकर गोजारे, विद्युत विभागाच्या प्रमुख मनीषा शेकटकर, पथ विभागाचे प्रमुख राजेश बनकर, कार्यकारी अभियंता धनंजय गायकवाड, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंता श्रुती नाईक आदी उपस्थित होते.

कात्रज-कोंढवा रस्त्याच्या विकासासाठी आवश्यक जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया रखडल्याने महापालिका प्रशासनाने रस्त्याची प्रस्तावित ८४ मीटर रुंदी सध्या ५० मीटर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सध्या काम सुरू असून, हे काम मार्चमध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यानंतर उर्वरित रुंदीकरणासाठी आवश्यक जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू ठेवण्यात येणार आहे. संपूर्ण रस्त्याचे काम २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

कात्रज चौकातील उड्डाणपुलाचे काम डिसेंबर २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन असल्याची माहिती देण्यात आली. सेवा रस्त्याचे बहुतांश काम पूर्णत्वास आले आहे. ग्रेड सेपरेटरच्या कामासाठी अडथळा ठरणारे विद्युत पोल आणि ट्रान्सफॉर्मर तातडीने हटविण्याच्या सूचना विद्युत विभागाच्या मुख्य अभियंता मनीषा शेकटकर यांनी दिल्या.

कात्रज-कोंढवा रस्त्यावरील राजस चौक परिसरात राष्ट्रीय महामार्ग आणि सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. या उड्डाणपुलाचा रॅम्प कपिलामृत डेअरीसमोर उतरणार आहे. रॅम्पच्या कामामुळे वाहतूक पोलिसांच्या सहकार्याने सिल्व्हर ओक सोसायटीसमोर वाहनांना यू-टर्न घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. आयुक्त नवल किशोर राम यांच्या उपस्थितीत राजस सोसायटीनजीक पूर्ण झालेल्या सेवा रस्त्यावरून वाहतूक वळविण्यात आली.

दरम्यान, कात्रज-कोंढवा रस्त्याच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या आणि भूसंपादन प्रक्रियेतून वगळण्यात आलेल्या दहा मिळकतींचाही आयुक्तांनी आढावा घेतला. महापालिकेचे भूसंपादन विभागाचे उपायुक्त निखिल मोरे यांनी या मिळकतींच्या सद्य:स्थितीची माहिती दिली. संबंधित जागांची संयुक्त मोजणी सुरू करण्यात आली असून, मोजणीनंतर क्षेत्रफळ निश्चित केले जाणार आहे.

त्यानंतर एका महिन्यात संबंधित जागामालकांची संमती घेऊन रस्त्याच्या कामासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. भूसंपादनामुळे रस्त्याचे काम रखडू नये, यासाठी जागामालकांशी प्रत्यक्ष चर्चा करून त्यांच्या अडचणी समजून घेण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. चिदानंद सोसायटीच्या चेअरमन यांच्याशीही रस्ता विकासाच्या कामाबाबत जागेवर चर्चा करण्यात आली.

### सेवा रस्त्याचे काम पूर्णत्वाकडे

कात्रज-कोंढवा मार्गावरील सेवा रस्त्याचे बहुतांश काम पूर्ण झाले आहे. राजस सोसायटीनजीक पूर्ण झालेल्या सेवा रस्त्यावरून वाहतूक वळविण्यात आली आहे.

> “ रुंदीकरणासाठी आवश्यक मिळकतींच्या जागा ताब्यात घेणे, विद्युत वाहिन्या हलविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. ५० मीटर रुंदीचे काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित प्रस्तावित रुंदीकरणासाठी जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू ठेवली जाणार आहे.
>
> - नवल किशोर राम, **आयुक्त, पुणे महापालिका**

# एचसीएमटीआरला अखेर मुहूर्त! नोव्हेंबरमध्ये दोन निविदा

**महाईन्यूज । पुणे**

**शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि खासगी वाहनांची संख्या लक्षात घेऊन प्रस्तावित करण्यात आलेल्या उच्चतम क्षमता द्रुतगती मार्गाच्या (एचसीएमटीआर) प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेला अखेर मुहूर्त मिळणार आहे. प्रकल्पाच्या चारपैकी दोन टप्प्यांतील कामांसाठी येत्या नोव्हेंबर महिन्यात स्वतंत्रपणे दोन निविदा काढण्यात येणार आहेत. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी याबाबत माहिती दिली.**

शहरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेऊन महापालिकेने १९८६ मध्ये सुमारे ३६ किलोमीटर लांबीचा एचसीएमटीआर हा एलिव्हेटेड वर्तुळाकार मार्ग उभारण्याचा प्रकल्प प्रस्तावित केला होता. मात्र, विविध कारणांमुळे हा प्रकल्प अनेक वर्षांपासून रखडला होता. आता या प्रकल्पाला गती देण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पीएमआरडीएच्या हद्दीतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी एकात्मिक विकास आराखडा तयार करण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी द्विस्तरीय समिती स्थापन केली आहे. या समितीच्या माध्यमातून शहरातील वाहतूक व्यवस्थेचा आढावा घेऊन विविध प्रकल्पांना गती देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्याच अनुषंगाने अनेक वर्षांपासून रखडलेल्या एचसीएमटीआर प्रकल्पाच्या कामाला चालना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



त्यानुसार महापालिका प्रशासनाने प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक आणि प्रशासकीय बाबींची पूर्तता केली आहे. निविदेसाठी आवश्यक कागदपत्रे तसेच इतर तयारी पूर्ण झाली असून, नोव्हेंबरमध्ये दोन टप्प्यांसाठी स्वतंत्र निविदा प्रसिद्ध करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढील प्रशासकीय प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या एचसीएमटीआर प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला गती मिळण्याची शक्यता आहे. महापालिकेकडून सिंहगड रस्त्यावरील पु. ल. देशपांडे उद्यान ते लक्ष्मीनारायण थिएटर चौक, सातारा रस्ता, बिबवेवाडी, गंगाधाम चौक ते लुल्लानगर या मार्गाचा समावेश असलेल्या एका टप्प्यासाठी सुमारे दोन हजार कोटी रुपयांची निविदा काढण्यात येणार आहे. तर विमाननगर ते विश्रांतवाडी आणि पुढे बॉम्बे सॅपर्स या मार्गाचा समावेश असलेल्या दुसऱ्या टप्प्यासाठी स्वतंत्र निविदा काढण्यात येणार आहे. या दोन्ही टप्प्यांच्या निविदा नोव्हेंबरमध्ये प्रसिद्ध करण्याचे महापालिका प्रशासनाचे नियोजन आहे.

एचसीएमटीआर हा शहरातील प्रमुख भागांना जोडणारा एलिव्हेटेड वर्तुळाकार मार्ग म्हणून प्रस्तावित करण्यात आला आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित कंत्राटदारांची नियुक्ती आणि आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

> “ एसएमटीआर प्रकल्पाच्या निविदेसाठी आवश्यक असलेली सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे. येत्या नोव्हेंबर महिन्यात प्रकल्पाची निविदा काढण्यात येईल.
>
> - नवल किशोर राम, **आयुक्त, पुणे महापालिका**

# पिंपरी-चिंचवडला हवे शासकीय ‘एमबीबीएस’ महाविद्यालय!

## वायसीएमशी संलग्न वैद्यकीय महाविद्यालयासाठी आमदार महेश लांडगे यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरात शासकीय अथवा महापालिकेचे एमबीबीएस महाविद्यालय सुरू करण्याची मागणी आमदार महेश लांडगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. वायसीएम रुग्णालयाशी संलग्न महाविद्यालयाला तत्वतः मान्यता देऊन त्यासाठी जागा, निधी आणि मनुष्यबळाचा सविस्तर प्रस्ताव निश्चित मुदतीत मागवावा, असे साकडे त्यांनी घातले आहे.**






पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या सुमारे ४० लाखांपर्यंत पोहोचली असताना शहरात सरकारी किंवा महापालिकेचे एमबीबीएस महाविद्यालय नसल्याचा मुद्दा लांडगे यांनी उपस्थित केला आहे. वायसीएम रुग्णालयाशी संलग्न संस्थेत एमडी आणि एमएस पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहेत; मात्र एमबीबीएससाठी स्थानिक विद्यार्थ्यांना पुणे, इतर जिल्हे किंवा खासगी संस्थांकडे जावे लागते, असे पत्रात नमूद आहे.

खासगी वैद्यकीय शिक्षणाचा वाढता खर्च मध्यमवर्गीय कुटुंबांना पेलणे कठीण होत असल्याचे लांडगे यांनी म्हटले आहे. पत्रात दिलेल्या अंदाजानुसार, काही खासगी संस्थांमध्ये साडेचार वर्षांचे शिक्षण शुल्क, निवास आणि इतर शुल्क मिळून एमबीबीएसचा खर्च सुमारे ₹१.४८ कोटी होऊ शकतो. हा सर्व महाविद्यालयांना लागू असलेला दर नसून पत्रातील खर्चाचा अंदाज आहे. राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या निर्देशानुसार एमबीबीएसचे शिक्षण शुल्क साडेचार वर्षांच्या शैक्षणिक कालावधीपुरतेच आकारायचे आहे.

महाविद्यालयासाठी महापालिकेचा ठोस प्रस्ताव अद्याप तयार झालेला नसल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून मिळाल्याचेही लांडगे यांनी पत्रात म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, नगरविकास विभाग आणि पिंपरी-चिंचवड महापालिका यांची संयुक्त बैठक बोलवावी, अशी त्यांची मागणी आहे. जागा, आर्थिक तरतूद, आवश्यक मनुष्यबळ आणि राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या निकषांचा समावेश असलेला प्रस्ताव प्रशासनाने निश्चित कालमर्यादेत सादर करावा; त्यानंतर राज्य शासनाने मान्यता व निधीबाबत निर्णय घ्यावा, असेही त्यांनी सुचवले आहे.

गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांतील गुणवंत विद्यार्थ्यांना परवडणारे वैद्यकीय शिक्षण उपलब्ध व्हावे आणि शहराच्या वाढत्या आरोग्यसेवेसाठी डॉक्टर घडावेत, यासाठी मुख्यमंत्र्यांनी या विषयात वैयक्तिक लक्ष घालावे, अशी विनंती लांडगे यांनी केली आहे.

> “पिंपरी-चिंचवडमधील गुणवंत विद्यार्थ्यांना एमबीबीएस शिक्षणासाठी शहराबाहेर जावे लागते किंवा खासगी महाविद्यालयांचा मोठा खर्च करावा लागतो. वायसीएम रुग्णालयाशी संलग्न शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्यास सामान्य कुटुंबांतील विद्यार्थ्यांना संधी मिळेल आणि शहराच्या आरोग्यसेवेलाही बळ मिळेल. यासाठी राज्य शासनाने महापालिकेकडून कालबद्ध प्रस्ताव मागवून निर्णय घ्यावा. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे घातले आहे.””
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**





## भूमिका

# शेअर बाजाराला विदेशी गुंतवणुकीचा धक्का



**भारतीय शेअर बाजारातील घसरणीचे सत्र पुन्हा सुरू झाले असून, त्याचा थेट फटका गुंतवणूकदारांना बसत आहे. जगभरातील अस्थिरता, युद्धजन्य परिस्थिती, तेलाच्या पुरवठ्यावर निर्माण झालेला दबाव आणि अमेरिकी डॉलरच्या तुलनेत कमजोर होत असलेला रुपया या घटकांचा बाजारावर परिणाम होत आहे.**

त्यात विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून भारतीय बाजारातून मोठ्या प्रमाणावर पैसा काढून घेतला जात असल्याने परिस्थिती अधिकच चिंताजनक बनली आहे. मात्र, या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर काही महत्त्वाचे विरोधाभासही समोर येतात. भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असल्याचे सरकारी आकडेवारी सांगते.

उत्पादन आणि सेवा क्षेत्राची कामगिरीही समाधानकारक असल्याचे चित्र आहे. अशा वेळी भारतीय अर्थव्यवस्थेच्या भवितव्याबाबत विदेशी गुंतवणूकदारांचा विश्वास कमी का होत आहे, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. अर्थव्यवस्था वाढत असताना शेअर बाजारातून विदेशी पैसा बाहेर जाणे हा निश्चितच विचार करण्यास भाग पाडणारा विरोधाभास आहे. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार बाजारातील महत्त्वाचे घटक आहेत. त्यांची मोठ्या प्रमाणावर खरेदी झाली की बाजाराला आधार मिळतो आणि विक्री वाढली की बाजारावर दबाव येतो. सध्या त्यांची माघार विविध कारणांनी सुरू आहे. जागतिक बाजारपेठांमध्ये अधिक परतावा मिळण्याची शक्यता, भारतीय रुपयाची घसरण, तेलाच्या वाढत्या किमती आणि भू-राजकीय अनिश्चितता यामुळे त्यांच्या गुंतवणूक धोरणात बदल होत असल्याचे दिसते. मात्र, या माघारीचा परिणाम केवळ निर्देशांकांवर होत नाही; लाखो छोट्या गुंतवणूकदारांच्या बचतीवरही त्याचा परिणाम होतो.

याहून महत्त्वाचे म्हणजे, विदेशी गुंतवणूकदारांचा भारतीय बाजारातील हिस्सा घटत असताना देशांतर्गत गुंतवणुकीचा आधार वाढत आहे. म्युच्युअल फंड आणि किरकोळ गुंतवणूकदारांमुळे बाजाराला काही प्रमाणात स्थैर्य मिळत असले, तरी केवळ देशांतर्गत गुंतवणुकीच्या बळावर बाजाराला दीर्घकाळ स्थिर ठेवणे कितपत शक्य आहे, याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. जागतिक अर्थव्यवस्था परस्परांशी घट्ट जोडलेली असताना विदेशी भांडवलाचे महत्त्व पूर्णपणे नाकारता येणार नाही. सरकार आणि नियामक संस्थांनी बाजारातील पारदर्शकता, गुंतवणूकदारांचा विश्वास आणि अर्थव्यवस्थेतील मूलभूत घटक यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्याची गरज आहे.

बाजारातील प्रत्येक घसरण रोखणे सरकारच्या हातात नसते; मात्र गुंतवणूकदारांच्या हिताचे संरक्षण आणि विश्वासाचे वातावरण निर्माण करणे निश्चितच शक्य आहे. शेअर बाजारातील चढ-उतार हे त्याच्या स्वभावाचा भाग आहेत. त्यामुळे प्रत्येक घसरणीला संकटाचे स्वरूप देणे योग्य नाही. मात्र, अर्थव्यवस्थेची वाढ आणि बाजारातील विदेशी गुंतवणुकीची माघार यातील विरोधाभास दुर्लक्षित करणेही धोकादायक ठरू शकते. देशी असो वा विदेशी, गुंतवणूकदाराचा विश्वास टिकवणे हीच बाजाराच्या स्थैर्याची खरी गुरुकिल्ली आहे.

## प्रासंगिक »

# रिकामी घागर

**एका गावात विठ्ठल नावाचा कुंभार राहत होता. त्याच्या दुकानात सुंदर माठ, घागरी आणि पणत्या असत. एकदा त्याने बाजारासाठी दोन मोठ्या घागरी तयार केल्या. दोन्ही दिसायला सारख्या होत्या; पण एका घागरीला अगदी बारीक भेग होती.**

विठ्ठलने ती भेग लक्षात घेतली, तरी घागर फेकून दिली नाही. त्याने ती गावातील एका वृद्ध शेतकऱ्याला दिली. शेतकरी रोज त्या घागरीत पाणी भरून शेताकडे नेत असे.

अर्ध्या वाटेत पाणी गळून जात असे. एक दिवस शेतकरी नाराज होऊन म्हणाला, "ही घागर काही उपयोगाची नाही. अर्धे पाणी तर वाटेतच जाते." विठ्ठल हसून त्याला त्या वाटेवर पाहायला घेऊन गेला. वाटेच्या दोन्ही बाजूंना फुलांची सुंदर रांग उमलली होती.

तो म्हणाला, "तुझ्या घागरीतून गळणाऱ्या पाण्यामुळे मी या वाटेवर बिया पेरल्या होत्या. तुझी कमतरता दुसऱ्याच्या सौंदर्याचे कारण बनली." शेतकऱ्याला जाणवले की प्रत्येक उणीव निरुपयोगी नसते.

- तात्पर्य : आपली कमतरता स्वीकारून तिचा योग्य उपयोग केला, तर त्यातूनही सुंदर परिणाम घडू शकतो.

देशातील सर्वोच्च शिक्षणसंस्थांपैकी एक म्हणून आयआयटीकडे पाहिले जाते. मात्र, याच संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटना वारंवार घडत असतील, तर ही केवळ वैयक्तिक समस्या न मानता संपूर्ण शिक्षणव्यवस्थेचे आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.

# आयआयटीतील आत्महत्यांचा गंभीर प्रश्न




उच्च दर्जाचे शिक्षण, कठीण प्रवेश परीक्षा आणि स्पर्धात्मक वातावरण यामुळे विद्यार्थ्यांवर असलेला ताण समजण्यासारखा असला, तरी त्यातून टोकाची परिस्थिती निर्माण होत असेल तर त्याची कारणे मुळापासून शोधावी लागतील.

उच्च शिक्षण संस्थांमधील आत्महत्यांबाबत अभ्यास करणाऱ्या राष्ट्रीय कृती दलाने अनेक कारणांकडे लक्ष वेधले आहे. त्यातील दोन मुद्दे विशेष महत्त्वाचे आहेत. पहिला म्हणजे जातीय भेदभाव आणि सामाजिक बहिष्कार. प्रवेशातील श्रेणी जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारणे, त्यांच्या क्षमतेबद्दल पूर्वग्रह बाळगणे किंवा अभ्यासगटांपासून दूर ठेवणे, अशा सूक्ष्म स्वरूपातील भेदभावामुळे वंचित विद्यार्थ्यांमध्ये परकेपणाची भावना निर्माण होऊ शकते. गुणवत्ता आणि समान संधी यांचा पुरस्कार करणाऱ्या संस्थांमध्ये अशा अनुभवांना कोणतेही स्थान असता कामा नये.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे अत्यंत तणावपूर्ण शैक्षणिक वातावरण. कठोर मूल्यमापन, अपयशाकडे पाहण्याची दंडात्मक भूमिका, शैक्षणिक प्रगतीचा दबाव आणि अपयशानंतर निर्माण होणारी असुरक्षितता यामुळे विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण वाढू शकतो. कठीण अभ्यासक्रम असणे ही समस्या नाही; परंतु त्या कठीणतेला सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना आधारव्यवस्था, समुपदेशन आणि विश्वासाचे वातावरण उपलब्ध नसेल, तर परिस्थिती गंभीर बनू शकते. कॅम्पसमधील सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरणाचाही विचार आवश्यक आहे. विविध जात, धर्म, प्रदेश आणि आर्थिक पार्श्वभूमीतून विद्यार्थी आयआयटीमध्ये येतात. त्यामुळे मतभिन्नता असणे स्वाभाविक आहे. मात्र, या मतभिन्नतेचे रूपांतर सामाजिक किंवा वैचारिक ध्रुवीकरणात झाले, तर विद्यार्थ्यांमधील संवाद आणि परस्पर विश्वास कमी होऊ शकतो.

विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी केवळ घटना घडल्यानंतर उपाययोजना करणे पुरेसे नाही. भेदभावाच्या तक्रारींची स्वतंत्र आणि निष्पक्ष दखल, संवेदनशील समुपदेशन व्यवस्था, तणावमुक्त संवादाचे वातावरण आणि मूल्यमापन पद्धतीचा पुनर्विचार या बाबींवर गांभीर्याने काम करावे लागेल. आयआयटीसारख्या संस्थांची खरी प्रतिष्ठा केवळ त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत नसते; प्रत्येक विद्यार्थ्याला सुरक्षित, सन्मानजनक आणि समान वातावरण मिळते की नाही, यावरही ती अवलंबून असते. एका विद्यार्थ्याचे जीवन वाचवणे ही कोणत्याही संस्थेच्या यशाची सर्वांत महत्त्वाची कसोटी ठरली पाहिजे.

## ।। अभंगवाणी ।।



कंठीं कृष्णमणी ।
नाहीं अशुभ ते वाणी ॥१॥

हो का नर अथवा नारी ।
रांड तयें नावें खरी ॥धृ.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# परतीचा पाऊस बरसणार; अनेक जिल्ह्यांना ‘यलो अलर्ट’

## मध्य महाराष्ट्र, कोकणात मेघगर्जनेसह वादळी पावसाचा अंदाज

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यात मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झाला असून उत्तर आणि मध्य भारतातील अनेक भागांतून पाऊस माघारी फिरला आहे. मात्र, महाराष्ट्रातील काही भागांत अद्याप वादळी पावसाची स्थिती कायम आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मध्य महाराष्ट्रातील बहुतांश भागांसह कोकणातील काही जिल्ह्यांमध्ये जोरदार वारे, मेघगर्जना आणि पावसाची शक्यता आहे. पावसाचा प्रभाव गुरुवारपर्यंत कायम राहण्याचा अंदाज आहे.**



संविधान चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिशेने मोर्चा काढण्याचा आंदोलकांनी प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवत बॅरिकेट्स लावून आंदोलकांना वाटेतच रोखले. त्यामुळे संतप्त झालेल्या आंदोलकांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन करून निषेध नोंदविला. या वेळी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी काही आक्रमक कार्यकर्त्यांना तात्पुरते ताब्यात घेतले.

संविधान आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी हा लढा सुरूच राहील, असा पवित्रा काँग्रेसच्या नेत्यांनी घेतला. एसआयआर प्रक्रियेबाबत काँग्रेसने तीव्र आक्षेप नोंदवत पात्र मतदारांची नावे मतदार यादीतून वगळली जाऊ नयेत, अशी भूमिका मांडली.

या आंदोलनात जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष कुंदा राऊत, काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते अतुल लोंढे आणि शहराध्यक्ष प्रफुल गुडधे पाटील यांच्यासह अनेक प्रमुख नेते सहभागी झाले होते. निवडणूक आयोगाच्या भूमिकेविरोधात नागपुरात झालेल्या या आंदोलनामुळे एसआयआर प्रक्रियेवरून सुरू असलेला राजकीय वाद पुन्हा चर्चेत आला आहे.

### वादळी पावसाचा इशारा

मध्य महाराष्ट्र, कोकण आणि घाट विभागातील अनेक जिल्ह्यांत मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता आहे. मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, सोलापूर, अहिल्यानगर आणि नाशिकला ‘यलो अलर्ट’ देण्यात आला आहे. पुढील चार ते पाच दिवसांत कमाल तापमानात २ ते ३ अंशांनी वाढ होण्याचा अंदाज आहे.

# २६५ तालुक्यांतील दहावी-बारावी विद्यार्थ्यांना मोठा दिलासा!

**महाईन्यूज । पुणे**

**राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क न घेता त्यांची आवेदनपत्रे भरून घ्यावीत, असे निर्देश महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने परिपत्रकाद्वारे दिले आहेत. याबाबतच्या सविस्तर सूचना लवकरच निर्गमित करण्यात येणार असल्याचेही मंडळाने स्पष्ट केले आहे.**



राज्यातील सर्व विभागीय मंडळांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील सर्व शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना या निर्णयाची माहिती तातडीने द्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच परीक्षा शुल्कमाफीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळाकडे तातडीने सादर करण्यासही सांगण्यात आले आहे. राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी याबाबत संबंधित विभागांना सूचना दिल्या आहेत.

राज्यात दुष्काळजन्य परिस्थिती असतानाही विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्काची मागणी केली जात असल्याने याबाबत नाराजी व्यक्त होत होती. दुष्काळामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट निर्माण झाले असताना परीक्षा शुल्काचा अतिरिक्त भार विद्यार्थ्यांच्या पालकांवर पडत होता. या पार्श्वभूमीवर राज्य मंडळाने परिपत्रक काढून दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून सवलत दिली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने यापूर्वी फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र अर्थात इयत्ता दहावी आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र अर्थात बारावीच्या परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाइन पद्धतीने भरून घेण्याबाबत सविस्तर सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार परीक्षा आवेदनपत्रे भरण्याची प्रक्रिया करण्यात येणार आहे.

दरम्यान, राज्य सरकारने २५ सप्टेंबर रोजी राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे विशेष बाब म्हणून या बाधित तालुक्यांमध्ये विविध उपाययोजना आणि सवलती लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामध्ये शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी देण्याचाही समावेश आहे.

या निर्णयानुसार राज्य मंडळाने दुष्काळग्रस्त तालुक्यांतील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क न घेता आवेदनपत्रे भरून घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे दुष्काळाच्या परिस्थितीत आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या विद्यार्थ्यांना आगामी बोर्ड परीक्षेसाठी मोठा दिलासा मिळणार आहे.

### दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना दिलासा

२६५ तालुक्यांमध्ये दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांकडून फेब्रुवारी-मार्च २०२७ परीक्षेसाठी शुल्क आकारले जाणार नाही. संबंधित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी शुल्क न घेता विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरून घ्यावीत, असे शिक्षण मंडळाने निर्देश दिले आहेत.

# वैमानिकांमध्ये झटापट, कॉकपिटमध्ये रक्त

## विमानातील प्रवाशांनी सांगितला थरार, दुबई-तेल अवीव विमान हायजॅकचा प्रयत्न?

**महाईन्यूज । दुबई**

**दुबईमधून तेल अवीवला जाणाऱ्या एका विमानात धक्कादायक घटना घडली आहे. फ्लाय दुबई कंपनीचं एक विमान दुबईवरून तेल अवीवला जात होतं. मात्र, यावेळी अचानक इमर्जन्सी अलर्ट जारी करण्यात आला. त्यामुळे सौदी अरेबियामध्ये विमान वळवण्यात आलं आणि इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं. मात्र, अचानक इमर्जन्सी अलर्ट जारी करण्यात आल्याने विमान हायजॅक झाल्याची भीती निर्माण झाली होती. त्यामुळे हे विमान सौदी अरेबियामध्ये उतरवण्यात आलं.**




"दुबईहून तेल अवीवला आम्ही जात होतो. मात्र, अचानक विमानात आम्ही आरडाओरडा ऐकला. मग कॉकपिट उघडलं आणि आम्हाला धक्का बसला. तिथे रक्त दिसलं, कोणीतरी पायलटवर खिशातील चाकूने हल्ला केला होता", असं एका प्रवाशाने सांगितलं. या घटनेनंतरचं वर्णन करताना आणखी एका प्रवाशाने टाइम्स ऑफ इस्रायलला सांगितलं की, "विमानाच्या केबिनमध्ये आरडाओरडा सुरू होता. हे ऐकल्यानंतर विमानात काहीतरी चुकीचं घडत असल्याचं लक्षात आलं. विमानात आरडाओरडा सुरू झाल्यानंतर काही वेळाने समजलं की एका पायलटवर चाकू हल्ला झाला आणि तो गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे विमानावरील नियंत्रण सुटलं होतं आणि ते वेगाने खाली आलं होतं. त्यामुळे काही क्षण असं वाटलं की कदाचित आता आपण वाचणार नाही", असा थरारक अनुभव एका प्रवाशाने सांगितला. या संदर्भातील वृत्त Ynet या इस्रायली वृत्तसंस्थेने दिलं आहे.

विमान हायजॅक झाल्याची भीती निर्माण झाली आणि विमानाचा मार्ग बदलून ते सौदी अरेबियामध्ये उतरवण्यात आलं. या घटनेमुळे इस्रायलने तात्काळ आपली लढाऊ विमाने आकाशात तैनात केली. तसेच इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनी सुरक्षेशी संबंधित तातडीची बैठक घेतली. मात्र, ही घटना हायजॅकची नव्हती, असं इस्रायलच्या पंतप्रधान कार्यालयाने नंतर स्पष्ट केलं, असं 'रॉयटर्स' ने दिलेल्या एका वृत्तात म्हटलं आहे.

एका इस्रायली सुरक्षा अधिकाऱ्याने सांगितलं की, विमान हायजॅक झाल्याची कोणतीही निश्चित माहिती नव्हती. मात्र, पायलटशी संपर्क होत नसल्याने भीतीचं वातावरण निर्माण झालं होतं. दरम्यान, हा प्रकार हायजॅकचा नसून दोन्ही पायलटमधील भांडणामुळे घडला होता, असं अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं. विमानातून विमानाने सुरुवातीला '७७००' हा आंतरराष्ट्रीय इमर्जन्सीचा कोड पाठवला. त्यानंतर लगेच विमान हायजॅक झाल्याचा किंवा हस्तक्षेपाचा इशारा देणारा '७५००' हा कोड पाठवला गेला. हा संदेश आल्यानंतर इस्रायलकडे जाणारे हे विमान सौदी अरेबियाच्या दिशेने मागे फिरले.

### नेमक काय घडलं?

विमानाचं इमर्जन्सी लँडिंग झाल्यानंतर करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली आहे. दुबईमधून तेल अवीवला जाणाऱ्या या विमानातील दोन्ही वैमानिकांमध्ये झटापट झाल्याची घटना घडली आहे. YNET या इस्रायली वृत्तवाहिनीने दिलेल्या वृत्तानुसार, या विमानात २७ मुलांसह एकूण १७४ प्रवासी होते. दोन्ही वैमानिकांमध्ये झालेल्या हाणामारीत इमर्जन्सीचा सिग्नल पाठवण्यात आला. त्यानंतर हे विमान सौदी अरेबियात सुखरूप उतरवण्यात आलं. मात्र, ही विमान हायजॅकची घटना नसल्याचं स्पष्टीकरण देण्यात आलं आहे.

# दिल्ली विमानतळावर कोटीचे 10 अत्याधुनिक डिफेन्स ड्रोन्स जप्त; तिन्ही प्रवाशांना अटक

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमा शुल्क विभागाने (कस्टम्स) मोठी कारवाई करत तब्बल १ कोटी ३ लाख रुपयांहून अधिक किमतीचे १० अत्याधुनिक व्यावसायिक आणि संरक्षण दर्जाचे ड्रोन्स जप्त केले आहेत. या प्रकरणी तीन भारतीय प्रवाशांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांची कसून चौकशी सुरू आहे. २५ सप्टेंबर रोजी गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.**




कस्टम्स अधिकाऱ्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, हे तिन्ही प्रवासी हाँगकाँगहून व्हिएतनाममार्गे दिल्लीला आले होते. दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल-३ वर विमान उतरल्यानंतर त्यांनी कस्टम्स तपासणी टाळण्याचा प्रयत्न केल्याचा अधिकाऱ्यांचा आरोप आहे. प्रवाशांनी कस्टम्स तपासणी टाळण्यासाठी ग्रीन चॅनेलमधून कोणतीही घोषणा न करता बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. मात्र, आधीच मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे कस्टम्स अधिकारी सतर्क होते. प्रवासी बाहेर पडण्याच्या तयारीत असतानाच अधिकाऱ्यांनी त्यांना अडवले आणि त्यांच्या सामानाची तपासणी सुरू केली.

झडतीदरम्यान प्रवाशांच्या सामानातून 'ऑटेल रोबोटिक्स एमडीएक्स-१' बनावटीचे एकूण १० उच्च तंत्रज्ञानयुक्त ड्रोन्स आढळून आले. या ड्रोन्ससोबत त्यांच्याशी संबंधित विविध अत्याधुनिक उपकरणेही जप्त करण्यात आली आहेत.

या प्रकरणात तिन्ही प्रवाशांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून ड्रोन्सच्या खरेदीपासून ते भारतात आणण्यापर्यंतच्या संपूर्ण व्यवहाराची माहिती घेतली जात आहे. ड्रोन्सची तांत्रिक क्षमता, त्यांचा संभाव्य वापर, त्यांची मालकी आणि त्यांची भारतात नेमकी कुठे वाहतूक केली जाणार होती, यासंदर्भातही तपास केला जात आहे.

सीमा शुल्क विभागाच्या या कारवाईमुळे आंतरराष्ट्रीय विमानतळांवरून अत्याधुनिक तंत्रज्ञानाची उपकरणे बेकायदेशीररीत्या भारतात आणण्याच्या प्रयत्नांवर पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, चौकशीतून आणखी काही महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

### ड्रोनसोबत अत्याधुनिक उपकरणेही जप्त

कस्टम्सच्या तपासणीत ड्रोन्ससोबत कंट्रोलर्स, कॅमेरा-माऊंटेड गिम्बल्स, केबल्स, प्रोपेलर्स आणि जॉयस्टिक्स यांसारखी उपकरणे आढळली. या सर्व साहित्याची किंमत मिळून एकूण जप्त मालाची किंमत १ कोटी ३ लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याचे कस्टम्सच्या माहितीतून समोर आले आहे. विशेष म्हणजे, प्रवाशांच्या सामानातून एक आयफोन १८ प्रो मॅक्स देखील जप्त करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रवासामागील नेमका उद्देश काय होता आणि हे अत्याधुनिक ड्रोन्स भारतात कोणासाठी आणले जात होते.

# ‘आम्ही तीन तिघी’ म्हणत अमृताने शेअर केले फोटो



मराठी मनोरंजन क्षेत्रातील अभिनेत्री ऑन स्क्रीन आणि ऑफ स्क्रीन देखील खूप चांगल्या मैत्रीणी आहे. अभिनेत्री अमृता खानविलकर, नेहा पेंडसे, सोनाली खरे, प्रसाद ओकची पत्नी मंजिरी ओक यांची मैत्री चर्चेत असते. अलीकडेच एका मुलाखतीदरम्यान, अमृताने आम्ही चौघी बेस्ट फ्रेंड्स असून आमची गर्ल्स गँग असल्याचे म्हंटले होते. आता याच गर्ल्स गँगबरोबर अमृता फिरायला गेली आहे. अमृता खानविलकर, नेहा पेंडसे आणि सोनाली खरे या तिघी सध्या इटलीला फिरायला गेल्या आहेत. या ट्रिपचे फोटो अमृताने स्वतः शेअर असून फोटोच्या खाली “आम्ही तीन तिघी” असे लिहिले. अमृताने पिझ्झा, पास्ता, तिरामिसू असं लिहीत एक हिंट दिली होती, त्यावरुन ती इटलीला गेल्याचे समजले. इटलीला पोहोचल्यावर अमृताने एक गंमतशीर व्हिडिओ शेअर केला. त्या व्हिडिओत तिघी स्वतःच्या बॅगा ओढताना दिसत आहेत. अमृता म्हणते, “तुम्ही रील्समध्ये बघितलं असेल, स्वतःचं सामान उचलून प्रवास करायचा. तेच आम्ही करतोय आता. आम्ही आता बसने फ्लोरेन्सला चाललोय. या बॅगांचं काय सांगू? बॅगांनी पुरता दम काढलाय आमचा.” तिचा हा मजेशीर व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर तुफान व्हायरल होत आहे. दरम्यान, आता अमृता, नेहा आणि सोनाली या तिघीजणी इटलीत काय धमाल करणार हे पाहण्यासाठी चाहतेही उत्सुक आहेत. परंतु सध्या या मैत्रिणींची इटली ट्रीप अनेकांचे लक्ष वेधून घेत आहे.

# मी नेहमीच विद्रोही राहिलेय



अभिनेत्री फातिमा सना शेख सध्या तिच्या नव्या वेब सीरिज ‘हुंकार’मुळे चर्चेत आहे. बालकलाकार म्हणून ‘चाची 420’मधून अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवणाऱ्या फातिमाने पुढे ‘दंगल’सह अनेक चित्रपटांमध्ये काम केले. आता ‘हुंकार’मध्ये ती पहिल्यांदाच पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसत आहे. या सीरिजच्या निमित्ताने फातिमाने तिच्या भूमिकेबरोबरच अभिनयाचा प्रवास, कुटुंबाकडून मिळालेला पाठिंबा आणि स्वतःच्या स्वभावाबद्दलही मोकळेपणाने सांगितले. ‘हुंकार’ची कथा 17 वर्षांच्या मीनू रावत या मुलीभोवती फिरते. या कथेत एका गंभीर सामाजिक विषयाला वेगवेगळ्या व्यक्तिरेखांच्या नजरेतून मांडण्यात आले आहे. वकील, पोलीस अधिकारी आणि पीडित मुलगी अशा प्रत्येक पात्राचा या घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. फातिमाच्या मते, या सीरिजची खासियत म्हणजे कथेत अनेक आवाज आहेत. एकाच विषयावर प्रत्येक व्यक्तिरेखा आपली भूमिका आणि विचार मांडते. त्यामुळे प्रेक्षकांना केवळ एका बाजूची कथा न पाहता वेगवेगळ्या दृष्टिकोनातून परिस्थिती समजून घेता येते. ‘हुंकार’मध्ये फातिमा सना शेख एका पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसत आहे. गंभीर विषयावर आधारित कथा असल्यामुळे या भूमिकेसाठी भावनिक आणि मानसिक तयारीही महत्त्वाची होती. मात्र शूटिंगदरम्यान तणाव कसा हाताळते, याबद्दल बोलताना फातिमा म्हणते की कलाकाराचं खरं काम ‘ॲक्शन’ आणि ‘कट’च्या मधल्या काळात असतं. शॉटपूर्वी ती संवादांची तयारी करते. अनेकदा अनेक टेक द्यावे लागतात. मात्र एकदा अभिनयाचा प्रवाह सापडला की कलाकाराला स्वतःचा रिदम मिळतो आणि काम सहज होत जाते. फातिमासाठी अभिनय म्हणजे केवळ कॅमेऱ्यासमोर संवाद बोलणे नाही. तिच्या मते, प्रत्येक भूमिका कलाकाराला काहीतरी नवीन शिकवते. एखाद्या व्यक्तिरेखेची भूमिका साकारताना त्या पात्राचं आयुष्य जगण्याची संधी मिळते. आपल्या खऱ्या आयुष्यात कदाचित जे अनुभव कधीच मिळणार नाहीत, ते अभिनयामुळे अनुभवता येतात.




# रिलीजआधीच ‘दृश्यम 3’चा धुमाकूळ.!

ऑक्टोबर 2 याद है ना?’... ‘दृश्यम’च्या चाहत्यांना ही तारीख चांगलीच लक्षात राहिली आहे. कारण याच दिवशी विजय साळगावकर पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर परतणार आहे. अजय देवगणचा बहुप्रतीक्षित ‘दृश्यम: द कन्क्लूजन’ रिलीज होण्याआधीच बॉक्स ऑफिसवर आपला दबदबा निर्माण करताना दिसत आहे. सिनेमाच्या ॲडव्हान्स बुकिंगला प्रेक्षकांचा जबरदस्त प्रतिसाद मिळत असून, रिलीजपूर्वीच लाखो तिकिटांची विक्री झाली आहे. अवघ्या काही दिवसांच्या बुकिंगमध्ये सिनेमाने 17 कोटी रुपयांहून अधिक ग्रॉस कमाई केली आहे. त्यामुळे आता 2 ऑक्टोबरला ‘दृश्यम 3’ बॉक्स ऑफिसवर नेमका किती मोठा धमाका करणार, याकडे संपूर्ण इंडस्ट्रीचं लक्ष लागलं आहे. अजय देवगणच्या ‘दृश्यम’ फ्रँचायझीला गेल्या काही वर्षांत प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे या तिसऱ्या आणि अंतिम भागाबाबत सुरुवातीपासूनच प्रचंड उत्सुकता होती. आता ॲडव्हान्स बुकिंगच्या आकडेवारीतूनही ही उत्सुकता स्पष्टपणे दिसून येत आहे. ताज्या रिपोर्टनुसार, ‘दृश्यम 3’च्या ॲडव्हान्स बुकिंगमधून आतापर्यंत सुमारे ₹17.35 कोटींची ग्रॉस कमाई झाली आहे. सिनेमाच्या पहिल्या दिवसासाठी तब्बल 2.24 लाख तिकिटांची विक्री झाल्याचं समोर आलं आहे. याशिवाय 7,500 हून अधिक शो बुक झाल्याची माहिती आहे. त्यामुळे प्रदर्शनाच्या दिवसापर्यंत बुकिंगचे आकडे आणखी वाढण्याची शक्यता आहे. ‘दृश्यम 3’च्या ॲडव्हान्स बुकिंगची तुलना आता मागील भागाशी केली जात आहे. 2022 मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘दृश्यम 2’ने पहिल्या दिवशी भारतात ₹15.38 कोटींची नेट कमाई केली होती. यावेळी ॲडव्हान्स बुकिंगलाच मोठा प्रतिसाद मिळत असल्याने ट्रेडमध्ये सिनेमाच्या ओपनिंगबाबत मोठ्या अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.

# कॅप्टन गिलचा ‘रुद्रअवतार’! ११ वे शतक

## ४०६ धावांच्या आव्हानावर पडला तुटून; भारतीय कर्णधार म्हणून सर्वात वेगवान शतक

**महाईन्यूज । गुवाहाटी**

**भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार शुबमन गिल याने वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात तुफानी फलंदाजी करत ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. गिलने अवघ्या ६२ चेंडूंत खणखणीत शतक झळकावत भारतीय कर्णधार म्हणून सर्वात जलद एकदिवसीय शतक ठोकण्याचा नवा विक्रम आपल्या नावे केला. यासह त्याने २०२३ च्या विश्वचषकात अफगाणिस्तानविरुद्ध रोहित शर्माने नोंदवलेला ६३ चेंडूंतील शतकाचा विक्रम मोडीत काढला आहे.**



गुवाहाटी येथील बारसापारा स्टेडियमवर नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा भारताचा निर्णय सुरुवातीला महागडा ठरला होता. वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी जोरदार आक्रमण चढवत पहिल्या डावात ४०५ धावांचा डोंगर उभा केला. भारतासमोर विजयासाठी ४०६ धावांचे महाकाय आव्हान होते.

या आव्हानाचा पाठलाग करताना कर्णधार शुबमन गिल आणि अनुभवी सलामीवीर रोहित शर्मा यांनी भारतीय डावाची आक्रमक सुरुवात केली. सुरुवातीच्या टप्प्यात रोहितने अधिक आक्रमक पवित्रा घेत अवघ्या ३२ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. या वेळी गिलने संयमी भूमिका घेत रोहितला उत्तम साथ दिली. सुरुवातीला ११ चेंडूंत १४ धावांवर खेळणाऱ्या गिलने खेळपट्टीवर जम बसताच आपल्या फलंदाजीची गती वाढवली.

गिलने किमो पॉलविरुद्ध चौकार आणि त्यानंतर तब्बल ९५ मीटरचा उत्तुंग षटकार ठोकत ३७-३८ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. अर्धशतकानंतर मात्र गिलने गिअर बदलून विंडीज गोलंदाजांवर चौफेर हल्ला चढवला. १५ व्या षटकात रॉस्टन चेसच्या गोलंदाजीवर पुढे सरसावत त्याने मारलेला ९० मीटरचा षटकार आणि आणखी एक उत्तुंग फटका सामन्याचे आकर्षण ठरला. त्यानंतर किमो पॉल आणि अल्झारी जोसेफ यांच्या गोलंदाजीवर त्याने सलग सीमापार फटके लगावले.

१९ व्या षटकात जोसेफविरुद्ध षटकार आणि चौकार ठोकत गिल ९२ धावांवर पोहोचला. अखेर २० व्या षटकात मिड-विकेटच्या दिशेने फ्लिक करत त्याने ६२ चेंडूंत आपले विक्रमी शतक पूर्ण केले. गिलने पुढच्या केवळ २९ चेंडूंत तब्बल ५६ धावांची भर घातली आणि तो ६६ चेंडूंत १०६ धावांवर पोहोचला. २० षटकांच्या समाप्तीनंतर भारताने बिनबाद १८८ धावांची मजल मारत विशाल आव्हानाला चोख प्रत्युत्तर दिले.

विशाल आव्हानाचा पाठलाग करताना सामन्याची परिस्थिती ओळखणे, आवश्यकतेनुसार खेळात आक्रमकता आणणे आणि ज्येष्ठ खेळाडूंच्या उपस्थितीत शांत राहून संघाला विजयाच्या मार्गावर नेणे या गुणांमुळे गिल भारतीय संघात विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या खांद्याला खांदा लावून उभा राहणारा आधारस्तंभ ठरत आहे. त्याची ही प्रगल्भता आणि फॉर्म २०२७ च्या आगामी एकदिवसीय विश्वचषकाच्या दृष्टीने भारतीय संघासाठी अत्यंत आश्वासक मानली जात आहे.

### विक्रमांची दमदार शतकी मालिका!

शुबमन गिलने शतकी खेळीदरम्यान आपल्या नावावर अनेक महत्त्वपूर्ण विक्रमांची नोंद केली. हे त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीतील ११ वे शतक, तर कर्णधार म्हणून तिसरे शतक ठरले. अवघ्या ६८ डावांत ११ शतके पूर्ण करत त्याने सर्वात जलद ११ शतके करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तिसरे स्थान मिळवले. या यादीत हाशिम आमला ६४ डाव आणि क्विंटन डी कॉक ६५ डावांसह गिलच्या पुढे आहेत. याच सामन्यात गिलने मायदेशातील एकदिवसीय क्रिकेटमध्ये २,००० धावांचा टप्पाही गाठला. अवघ्या ३३ डावांत हा पराक्रम करत त्याने वेस्ट इंडिजचे दिग्गज डेस्मंड हेन्स यांचा ३६ डावांचा विक्रम मागे टाकला.

# भारतीय महिला हॉकी संघाची फायनलमध्ये धडक! २ ऑक्टोबरला चीनशी महामुकाबला

**महाईन्यूज । मुंबई**

**आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मधील महिला हॉकी स्पर्धेत भारतीय संघाने दिमाखात अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या उपांत्य फेरीच्या लढतीत भारतीय महिला हॉकी संघाने दक्षिण कोरियावर २-० अशी मात करत सुवर्णपदकाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले. आता २ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या महाअंतिम सामन्यात भारताची गाठ यजमान चीनशी पडणार आहे.**




चीनने दुसऱ्या उपांत्य फेरीत जपानला पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-२ अशा फरकाने नमवत अंतिम फेरी गाठली आहे, तर कांस्यपदकासाठी जपान आणि दक्षिण कोरिया यांच्यात सामना रंगणार आहे.

दक्षिण कोरियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यात सुरुवातीपासूनच दोन्ही संघांमध्ये तोडीस तोड संघर्ष पाहायला मिळाला. बचावात्मक पवित्रा आणि आक्रमक चढाया यामुळे पूर्वार्धातील दोन क्वार्टर संपेपर्यंत सामना गोलशून्य बरोबरीत सुटला होता. मात्र, तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारतीय खेळाडूंनी आक्रमक रणनीती अवलंबत खेळावर पकड मिळवली. सामन्याच्या ४३व्या मिनिटाला भारताला अत्यंत महत्त्वाचा पेनल्टी कॉर्नर मिळाला. दीपिकाकडून अचूक मिळालेल्या पासवर इशिकाने कोणताही विलंब न लावता चेंडू थेट गोलजाळ्यात धाडला आणि प्रतिस्पर्धी गोलरक्षकाला चकवत भारताचे खाते उघडले.

त्यानंतर अवघ्या चार मिनिटांतच, म्हणजेच ४७व्या मिनिटाला भारतीय संघाने आघाडी दुप्पट केली. भारताची कर्णधार सलीमा टेटेने मिळालेल्या संधीचा पुरेपूर फायदा घेत चेंडूवर ताबा मिळवला, वेगाने 'डी' सर्कलमध्ये प्रवेश केला आणि मध्यभागी उत्कृष्ट पास दिला. हा चेंडू कोरियाच्या बचावफळीतील खेळाडूच्या स्टिकला लागून गोलजाळ्यात गेला, ज्यामुळे हा गोल कर्णधार सलीमाच्या नावावर नोंदवला गेला. या दोन महत्त्वपूर्ण गोलांच्या बळावर भारताने सामन्यात २-० अशी अजिंक्य आघाडी मिळवत दिमाखदार विजय साकारला. गेल्या महिन्यात नेदरलँड्स येथे पार पडलेल्या एफआयएच विश्वचषक स्पर्धेच्या साखळी फेरीत भारत आणि चीन आमनेसामने आले होते. त्यावेळी भारताने चीनला २-२ अशा बरोबरीत रोखले होते.

### महिला हॉकी संघाकडून मोठी अपेक्षा

विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने ऐतिहासिक कामगिरी करत पाचवे स्थान पटकावले होते, जी १९७४ नंतरची भारताची सर्वोत्तम कामगिरी ठरली होती. त्यामुळे आगामी अंतिम फेरीत भारतीय संघाचे मनोबल उंचावलेले असणार आहे. या स्पर्धेतील भारताचा सध्याचा फॉर्म पाहता महिला हॉकी संघाकडून सुवर्णपदकाची मोठी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. भारतीय संघाने साखळी फेरीत प्रतिस्पर्धी संघांवर एकतर्फी वर्चस्व गाजवले होते. भारताने उझबेकिस्तानचा १९-०, इंडोनेशियाचा १७-१, थायलंडचा २०-१, जपानचा ३-१ आणि सिंगापूरचा ७-० असा धुव्वा उडवत दिमाखात उपांत्य फेरी गाठली होती.

स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज ™
ePaper
। गुरुवार ।
दि. 01 ऑक्टोबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षपदी देवेंद्र तायडे

## शरद पवार यांच्या मान्यतेने नियुक्ती; पक्ष निरीक्षक सुनील माने यांची माहिती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पिंपरी- चिंचवड शहर - जिल्हा अध्यक्षपदी देवेंद्र तायडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष पद्मविभूषण खासदार शरद पवार साहेब यांच्या मान्यतेने आणि शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या सूचनेनुसार, प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांनी आज श्री. देवेंद्र तायडे यांची नियुक्ती केली, अशी माहिती पक्षाचे प्रदेश सरचिटणीस व पिंपरी- चिंचवडचे पक्ष निरीक्षक सुनील माने यांनी दिली.**



पक्षाच्या मुंबईतील मुख्यालयात प्रदेश सरचिटणीस रविंद्र पवार यांनी त्यांना आज नियुक्तीचे पत्र दिले.

याबाबत बोलताना ते म्हणाले, लोकनेते मा.श्री. शरदचंद्र पवार साहेबांच्या नेतृत्वावर आणि विचारांवर विश्वास असलेल्या पिंपरी चिंचवड शहराच्या शहराध्यक्षपदाची जबाबदारी पक्षाने संघटनात्मक अनुभव असलेल्या श्री. देवेंद्र तायडे यांच्यासारख्या चळवळीतून पुढे आलेल्या कार्यकर्त्यावर सोपविली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे पिंपरी चिंचवड शहर व जिल्ह्यात पक्ष संघटनेला नवी दिशा प्राप्त होईल. त्यांच्या नेतृत्वात आगामी काळात पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबुत होऊन कार्यकर्ते आणखी जोमाने पिंपरी चिंचवडच्या विविध प्रश्नांवर प्रभावीपणे काम करतील. पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा खासदार सुप्रियाताई सुळे, प्रदेश सरचिटणीस व आमदार रोहित पवार आणि वरिष्ठ नेते, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा करून पक्ष संघटना वाढीसाठी याबाबत निर्णय घेण्यात आला आहे, असे माने यांनी सांगितले.

### संघटना मजबूत करण्यावर भर

देवेंद्र तायडे यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे. शहरातील विविध प्रश्नांवर कार्यकर्त्यांनी प्रभावीपणे काम करावे, यासाठी आगामी काळात संघटनात्मक पातळीवर नियोजन केले जाणार आहे.



# शहर भाजप सरचिटणीसपदी संजय पटनी

## दोन दशकांच्या समाजिक कार्याचा पक्षश्रेष्ठींकडून सन्मान; आमदार महेश लांडगे यांच्या निष्ठावंताला संघटनेत संधी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारतीय जनता पार्टीच्या पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा सरचिटणीसपदी संजय पटनी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. प्रसिद्धीप्रमुख आणि वरिष्ठ उपाध्यक्ष अशा विविध पदांवर काम केलेल्या पटनी यांच्यावर पक्षाने आता सरचिटणीसपदाची जबाबदारी सोपवली आहे.**



पटनी हे गेल्या २० वर्षांपासून आमदार महेश लांडगे यांच्या सामाजिक आणि राजकीय वाटचालीत सक्रिय सहभागी आहेत. पक्षाचे कार्यक्रम, संघटनात्मक उपक्रम आणि भाजपा परिवारातील विविध संस्था व संघटनांच्या कार्यात त्यांचा सातत्याने सहभाग राहिला आहे. शहरातील राजस्थानी, मारवाडी आणि हिंदीभाषिक समाजातील विविध घटकांशी त्यांचा व्यापक जनसंपर्क आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचे भोसरी विधानसभा मतदारसंघातील सर्व ४८३ बूथवर सलग चार महिने शंभर टक्के यशस्वी आयोजन करण्यासाठी पटनी यांनी महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला. बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांशी समन्वय साधून कार्यक्रमाच्या आयोजनात त्यांनी योगदान दिले.

पटनी यांच्या नियुक्तीबद्दल आमदार महेश लांडगे यांनी आनंद व्यक्त केला. गेल्या दोन दशकांतील त्यांची साथ, नि:स्वार्थ पक्षकार्य आणि कार्यकर्त्यांशी असलेले आत्मीय संबंध मोलाचे आहेत. त्यांच्या निष्ठेला आणि समर्पित कार्याला पक्षश्रेष्ठींनी योग्य न्याय दिल्याची भावना लांडगे यांनी व्यक्त केली. पटनी यांच्या अनुभवाचा आणि जनसंपर्काचा शहरातील पक्षसंघटनाला लाभ होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

नियुक्तीनंतर पटनी यांनी पक्षनेतृत्व, आमदार महेश लांडगे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे आणि सहकारी कार्यकर्त्यांचे आभार मानले. यावेळी संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस विकासजी डोळस, मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे, नगरसेवक उदय गायकवाड, नगरसेवक सागर गवळी आणि सहकारी उपस्थित होते पक्षाने दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. पक्षसंघटन बळकट करणे, समाजातील विविध घटकांशी संवाद वाढवणे आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करणे याला प्राधान्य देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

> "पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा भाजपाच्या सरचिटणीसपदी माझी नियुक्ती करून पक्षाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे. आमदार महेशदादा लांडगे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि पाठबळ माझ्यासाठी मोलाचे आहे. शहराध्यक्ष शत्रुघ्नजी काटे, पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी आणि सर्व सहकारी कार्यकर्त्यांच्या सहकार्याने ही जबाबदारी निष्ठेने पार पाडेन. पक्षसंघटन अधिक बळकट करणे आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी काम करणे याला माझे प्राधान्य राहील. माझ्यावर दाखवलेला विश्वास समर्पित कार्यातून सार्थ ठरवेन."
>
> **- संजय पटनी, सरचिटणीस, पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा भाजपा.**

# अभिमानास्पद: पिंपरी-चिंचवडच्या प्रिथिकाचा आशियाई स्पर्धेत सुवर्णवेध!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**अचूक निशाणा, संयम आणि सांघिक कौशल्याच्या जोरावर भारतीय महिला कंपाऊंड तिरंदाजी संघाने एची-नागोया आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. चीनचा अंतिम फेरीत २३८-२३४ असा पराभव करणाऱ्या भारतीय संघात पिंपरी-चिंचवडची प्रिथिका प्रदीप हिने महत्त्वपूर्ण योगदान दिले. तिच्या या कामगिरीमुळे शहराच्या क्रीडा इतिहासात सुवर्णपान जोडले गेले आहे.**




प्रिथिका प्रदीप, ज्योती सुरेखा वेन्नम आणि चिकिता तनीपार्थी या त्रिकुटाने अंतिम सामन्यात प्रभावी कामगिरी केली. भारतीय संघाने नोंदवलेल्या २३८ गुणांमुळे दक्षिण कोरियाने २०१४ मध्ये प्रस्थापित केलेल्या जागतिक आणि आशियाई विक्रमाशी बरोबरी साधली. या विजयासह भारतीय महिला संघाने सलग दुसऱ्यांदा आशियाई स्पर्धेतील विजेतेपद कायम राखले.

सुवर्णपदकापर्यंतचा प्रवासही चुरशीचा ठरला. उपांत्य फेरीत भारताने दक्षिण कोरियावर २३४-२३३ असा अवघ्या एका गुणाने विजय मिळवला होता. निर्णायक क्षणी दडपणाचा सामना करत भारतीय तिरंदाजांनी अंतिम फेरी गाठली आणि चीनविरुद्धही आपली अचूकता कायम ठेवत सुवर्णपदकावर मोहोर उमटवली.

## शहरातील धनुर्विद्येला नवी प्रेरणा

प्रिथिकाच्या यशाने पिंपरी-चिंचवडमधील उदयोन्मुख खेळाडूंसमोर आंतरराष्ट्रीय यशाचे प्रेरणादायी उदाहरण उभे राहिले आहे. शहरातून घडलेल्या खेळाडूने भारताचे प्रतिनिधित्व करत आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणे, ही स्थानिक क्रीडा क्षेत्रासाठी मोलाची उपलब्धी ठरली आहे. तिच्या वाटचालीत प्रशिक्षक कुणाल टावरे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि तांत्रिक प्रशिक्षण महत्त्वाचे ठरले. पालकांचा भक्कम पाठिंबा, नियमित सराव आणि खेळाप्रती असलेली निष्ठा यांच्या बळावर प्रिथिकाने हे यश संपादन केले. पिंपरी-चिंचवड आर्चरी असोसिएशनच्या माध्यमातून सुरू असलेल्या गुणवंत खेळाडू घडविण्याच्या प्रयत्नांनाही या कामगिरीमुळे प्रोत्साहन मिळाले आहे.

## 'शालेय वयातील गुणवत्ता सुवर्णपदकापर्यंत पोहोचली'

महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेच्या सहसचिव तथा पिंपरी-चिंचवड आर्चरी असोसिएशनच्या सचिव सोनल बुंदेले यांनी प्रिथिकाच्या कामगिरीबद्दल अभिमान व्यक्त केला. "प्रिथिकाची गुणवत्ता आणि तिच्यातील विशेष टॅलेंट शालेय वयात असतानाच ओळखण्याची संधी मला मिळाली होती. तिची जिद्द, मेहनत, शिकण्याची तयारी आणि खेळाप्रती असलेली निष्ठा आज एशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकापर्यंत पोहोचली आहे, याचा अभिमान वाटतो," असे बुंदेले यांनी सांगितले. प्रिथिकाची मेहनत, प्रशिक्षक कुणाल टावरे यांचे मार्गदर्शन आणि पालकांचा भक्कम पाठिंबा यांचा या यशात महत्त्वाचा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यातही असोसिएशनच्या माध्यमातून गुणवंत खेळाडूंना योग्य प्रशिक्षण आणि संधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असेही बुंदेले यांनी स्पष्ट केले.

# ‘फ्रिंज एरिया’तील रहिवासी विकासाचा मार्ग मोकळा

## महानगरपालिकांसह ७ नगरपरिषदा व २ नगरपंचायतींलगतच्या क्षेत्रांना लाभ

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी एकत्रित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली (यूडीसीपीआर) लागू झाल्याने, प्राधिकरणाच्या हद्दीतील महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत यांच्या सभोवतालच्या निर्धारित परिघस्त अंतरातील शेती विभागातील जमिनींवर रहिवासी बांधकामासाठी परवानग्या मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या क्षेत्रांतील रस्ते जोडणीबाबत स्पष्टता आणण्यासाठी महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी परिपत्रकाद्वारे विशेष कार्यपद्धती निश्चित केली आहे. या निर्णयामुळे हजारो जागामालक व नागरिकांना दिलासा मिळणार असून, बांधकाम क्षेत्रासह नियोजित विकासालाही चालना मिळणार आहे.**




एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार (यूडीसीपीआर-२०२०) महापालिका हद्दीपासून २ किलोमीटर, नगरपरिषद हद्दीपासून १ किलोमीटर आणि नगरपंचायत हद्दीपासून अर्धा किलोमीटर अंतरातील शेती विभागातील जमिनींवर निर्धारित अधिमूल्य आकारून रहिवासी विभागातील अनुज्ञेय वापरास परवानगी देण्याची तरतूद आहे. मात्र, अशा विकासासाठी संबंधित क्षेत्रात सलग व परस्पर जोडलेले रस्त्यांचे जाळे असणे अपेक्षित आहे. या तरतुदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ‘पीएमआरडीए’ने नवीन कार्यपद्धती निश्चित केली आहे. लोणावळा नगरपरिषद वगळता, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, ७ नगरपरिषदा आणि २ नगरपंचायतींच्या परिघस्त क्षेत्रातील प्रस्तावांसाठी ही कार्यपद्धती तातडीने लागू करण्यात आली आहे. या कार्यपद्धतीनुसार मंजूर प्रादेशिक योजनेतील रस्ते, रद्द झालेल्या प्रारूप विकास योजनेतील रस्ते, प्रत्यक्ष अस्तित्वातील रस्ते तसेच संमतीने प्रस्तावित करण्यात येणारे रस्ते यांचा एकत्रित विचार करून विकास परवानगी प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येणार आहे. प्रस्तावातील अंतर्गत रस्ते लगतच्या जागा अथवा उपलब्ध रस्त्यांच्या जाळ्याशी जोडणे बंधनकारक करण्यात आले आहे.

> “शहरालगतच्या परिघस्त भागात विकासाचा दबाव मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यूडीसीपीआरमधील तरतुदींमुळे या भागातील रहिवासी विकास नियोजनबद्ध पद्धतीने करता येणार असून, आवश्यक रस्त्यांचे सुसंगत जाळे विकसित होण्यासही मदत होईल. नवीन कार्यपद्धतीमुळे रहिवासी विभागातील वापर अनुज्ञेय होणार असून, या भागाच्या सुनियोजित विकासाला गती मिळेल.”
> **- डॉ. अभिजीत चौधरी, महानगर आयुक्त, पीएमआरडीए.**

‘पीएमआरडीए’चा नवीन ‘स्ट्रक्चर प्लॅन’ प्रसिद्ध होईपर्यंत रद्द झालेल्या प्रारूप विकास योजनेतील रस्त्यांचाही सदर क्षेत्रातील विकास परवानगी प्रस्तावांमध्ये विचार करण्यात येणार आहे. तसेच, प्रत्यक्ष जागेवर नियमानुसार आवश्यक रुंदीचा पोहोच रस्ता उपलब्ध असल्यास संबंधित प्रस्तावास मंजुरी देण्याची कार्यवाही केली जाणार आहे. या निर्णयामुळे परिघस्त क्षेत्रातील अनधिकृत व विस्कळीत विकासाला आळा बसून नियोजनबद्ध विकासाला चालना मिळण्यास मदत होणार आहे.

### ठळक मुद्दे

- अंतराची मर्यादा : महापालिका हद्दीपासून २ कि.मी., नगरपरिषद हद्दीपासून १ कि.मी. आणि नगरपंचायत हद्दीपासून ०.५ कि.मी. पर्यंतचे क्षेत्र परीघस्त (FRINGE AREA) क्षेत्र म्हणून विचारात घेतले जाईल.
- लागू क्षेत्र : लोणावळा नगरपरिषद वगळता २ महापालिका, ७ नगरपरिषदा व २ नगरपंचायतींलगतच्या पीएमआरडीएतील परीघस्त क्षेत्रासाठी ही कार्यपद्धती लागू असेल.
- रस्त्यांचा एकत्रित विचार : मंजूर प्रादेशिक योजनेतील रस्ते, रद्द झालेल्या प्रारूप विकास योजनेतील रस्ते, प्रत्यक्ष अस्तित्वातील रस्ते आणि संमतीने प्रस्तावित रस्ते विचारात घेतले जातील.
- अंतर्गत रस्त्यांची जोडणी : नवीन ‘स्ट्रक्चर प्लॅन’ प्रसिद्ध होईपर्यंत रद्द झालेल्या विकास योजनेतील (डीपी) रस्त्यांचा विकास परवानगी प्रस्तावांमध्ये विचार करण्यात येणार आहे. तसेच, अंतर्गत रस्ते लगतच्या जागांना किंवा रस्त्यांना जोडणे बंधनकारक असेल.
- पोहोच रस्ता : प्रत्यक्ष जागेवर आवश्यक रुंदीचा पोहोच रस्ता उपलब्ध असल्यास संबंधित प्रस्तावाला मंजुरी देण्याची कार्यवाही केली जाईल.
- अधिमूल्य आकारणी : संबंधित जमिनीच्या वार्षिक मूल्यदर तक्त्यातील दराच्या १५ टक्के दरानुसार अधिमूल्य आकारणी करण्यात येईल.

---

# वर्तणूक, देहबोली आणि आत्मविश्वासाच्या जोरावर नोकरी, व्यवसाय क्षेत्रात यशस्वी होता येते

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या सहकार्याने आयोजित ‘प्रतिभा जॉब फेअर २०२६’ चे उद्घाटन चिंचवड येथील प्रतिभा महाविद्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाले.**




जळगाव, अमरावती, अहिल्यानगर, संभाजीनगर, मंचर, चाकण, सातारा, कोल्हापूर, पुणे, लोणावळा, तळेगाव, कल्याण आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील उमेदवारांनी रोजगाराच्या संधींसाठी सहभाग नोंदविला.

विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. धनंजय मंडलिक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व फुगे सोडून जॉब फेअरचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिभा ग्रुपचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा होते.

यावेळी ९२ कंपन्यांनी सहभाग घेतला, तर ४५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून सुमारे ५ हजार उमेदवारांची उपस्थिती होती. मार्गदर्शन करताना डॉ. धनंजय मंडलिक यांनी सांगितले की, केवळ पदवी पुरेशी नसून संवादकौशल्य, देहबोली, वर्तणूक आणि आवश्यक पूरक कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. मुलाखतीत अपयश आले तरी त्यातून चुका सुधारून पुढील संधीसाठी आत्मविश्वासाने प्रयत्न करावेत, असे त्यांनी आवाहन केले. आमदार उमा खापरे यांनी पदवीधर युवकांना योग्य वेळी रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचे सांगितले. कंपन्यांशी संपर्क निर्माण होणे हीदेखील मोठी संधी असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. दीपक शहा यांनी प्रतिभा महाविद्यालयाचा हा अकरावा जॉब फेअर असल्याचे सांगितले. मागील दहा जॉब फेअरच्या माध्यमातून विविध शैक्षणिक क्षेत्रातील ५ हजारांहून अधिक उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले. “कोणतेही काम छोटे किंवा मोठे नसते. संधीचा योग्य उपयोग करून कौशल्याच्या जोरावर भविष्यात स्वतःचा व्यवसाय उभारून इतरांना रोजगार देणारे उद्योजक बना,” असे आवाहन त्यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी उमेदवारांनी ज्ञानासोबत संवादकौशल्य, टीमवर्क आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# एसबीपीसीओएडी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

## वास्तुविशारद क्षेत्रातील संधींचा लाभ घेत विद्यार्थ्यांनी करिअर घडवावे – डॉ. महेश नामपुरकर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आंतरराष्ट्रीय स्तरावर वास्तुविशारद क्षेत्रात मोठ्या प्रमाणात स्पर्धा आहे. तरीही भारतात वास्तुविशारद क्षेत्रात अनेक संधी देखील उपलब्ध आहेत. जिथे कमतरता असते तिथे संधी उपलब्ध होते याचा उपयोग करून घेऊन आपले करिअर घडवावे असे मार्गदर्शन ज्येष्ठ वास्तुविशारद व आंतरराष्ट्रीय लँडस्केप डिझाईनर डॉ. महेश नामपुरकर यांनी केले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईन (एसबीपीसीओएडी) मध्ये २०२५ – २६ मधील बॅचलर ऑफ आर्किटेक्टच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट पुणे सेंटर चेअरमन आर्किटेक्ट शितेश अग्रवाल, एसबीपीसीओएडी प्राचार्या डॉ. स्मिता सूर्यवंशी, यशस्वी विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

नामपूरकर यांनी सांगितले की, वास्तुशास्त्र हा एक अतिशय सुंदर व्यवसाय आहे. विद्यार्थ्यांनी शिकण्याची आणि जे हवे आहे ते साध्य करण्याची जिद्द बाळगायला हवी. हे क्षेत्र तुम्हाला स्वातंत्र्य आणि सामर्थ्य देते. तसेच, तुम्हाला कुठे स्थायिक व्हायचे आहे, याची निवड करण्याचे स्वातंत्र्य आणि आत्मविश्वास मिळतो. देशसेवा करण्याचे हे एक चांगले क्षेत्र आहे.

यावेळी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. माजी विद्यार्थिनी आर्किटेक्ट हरश्री नखरानी यांना २०२५ या वर्षातील सर्वोत्तम विद्यार्थी प्रेरणा चषक देऊन गौरवण्यात आले. तसेच एमपीएससी स्पर्धा परीक्षेत असिस्टंट टाऊन प्लॅनर म्हणून निवड झाल्याबद्दल काजल थिटे, फोएड यंग वुमन अचीवर ऑफ द इयर हॉस्पिटलिटी साठी अंकिता पाटील, स्ट्राइड मेक स्पेस डिझाईन कॉम्पिटिशन मध्ये तिशा केला आणि आदर्श प्रधान तसेच पर्यावरण, शाश्वतता, वादविवाद पोस्टर डिझाईन बर्ड हाऊस डिझाईन आणि फोटोग्राफी मध्ये ओमकुमार बागले, जानवी भोसले, दिशा प्रधान, सिद्धी सावंत, भार्गवी पोहणे, आदित्य काळे, कृतिका चनी, प्रतिभा काकडे, सानिका काळे या बक्षीस विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. कॅम्प फोटोग्राफी मध्ये प्रथम क्रमांक राधिका मंत्री, द्वितीय क्रमांक सानिका सुतार, तृतीय क्रमांक संदली मेंधळकर, विशेष सहभागासाठी मृदुल मारळ, मृण्मयी चौधरी, ऐश्वर्या जाधव यांचाही गौरव करण्यात आला. स्कार्स ऑफ इंडिया – द अनटोल्ड बॅटल्स या पुस्तकासाठी स्वरा मुसळे, कलर्स ऑफ धर्म या कलरिंग बुक साठी गार्गी साठे यांना बक्षीस देण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२५ – २६ मधील ४३ गुणवंत विद्यार्थी आणि विविध क्षेत्रात यश मिळवलेल्या माजी विद्यार्थ्यांचा देखील सत्कार करण्यात आला. तसेच २०२६-२७ च्या विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष अमोद भेगडे, उपाध्यक्ष मृण्मयी चौधरी, सचिव कुशा गोयल, सांस्कृतिक प्रमुख सायली केसकर, क्रीडा प्रमुख मृदुल मारळ व विविध क्लब मध्ये निवड झालेल्या पदाधिकारी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. अजय हरताळे, इंटरनल सीनियर सुपरवायझर ऋजुता पाठक, लक्ष्मण तोरगळे, किसन काळे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सहभाग घेतला.

सूत्रसंचालन प्रा. शिवा शिशोविया व प्रा. दक्षा देशमुख यांनी केले. आभार प्राचार्या डॉ. स्मिता सूर्यवंशी यांनी मानले.

# कामगारांना न्याय देण्याचे काम पंतप्रधान मोदींनी केले : भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**जुन्या कामगार कायद्यामुळे भांडवलशाही मंडळी कामगारांना अडचणीत आणण्याचे प्रयत्न करीत होती. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुधारणा करून कामगारांना न्याय देण्याचे काम केले आहे. नवीन कामगार कायद्यातून कामगारांना त्यांच्या कुटुंबीयांना भविष्य निर्वाह निधी, आभा कार्डद्वारे पूर्ण कुटुंबासाठी आरोग्य विमा लाभ यासह अनेक सुविधा मिळणे आता सुलभ झाले आहे.**




या कायद्याच्या चौकटीत कामगारांना संरक्षण मिळत आहे. अनुप मोरे यांच्या नेतृत्वाखाली माथाडी संघटनेच्या राष्ट्रमातेचा समावेश असणारा लोगो हा राष्ट्र प्रथम हे कर्तव्य दर्शवणारा आहे. या संघटनेचे ५० हजार सदस्य नोंदणीचे ध्येय पूर्ण होण्यासाठी भारतीय जनता पार्टी कामगारांच्या पाठीशी पूर्ण ताकतीने उभी राहील असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी चिंचवड येथे केले.

भारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक, जनरल कामगार युनियन (रजि.) या संस्थेचा राज्यस्तरीय पदाधिकारी मेळावा मंगळवारी (दि. २९) चिंचवड येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी पिंपरी चिंचवडचे महापौर रवि लांडगे, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश दादा लांडगे, शंकर जगताप, उमाताई खापरे, पक्षनेते प्रशांत शितोळे, उपमहापौर शर्मिलाताई बाबर, माजी उपमहापौर व ज्येष्ठ नगरसेवक तुषार हिंगे, अध्यक्ष विजय हरगुडे, जयदीप खापरे, नगराध्यक्ष संतोष दाभाडे, अक्षय वरघडे, राकेश सणस, वसीम शेख आदींसह हजारो माथाडी कामगार उपस्थित होते. यावेळी नवीन निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला.

रवींद्र चव्हाण पुढे म्हणाले की, अनुप मोरे सारखा युवा कार्यकर्ता राज्यात माथाडी कामगारांचे नेतृत्व सक्षमपणे करीत आहे. अल्पावधीत या कामगार संस्थेचे १५ हजार सदस्य नोंदणी केली आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कामगारांनी कामगारांच्या कुटुंबीयांच्या हितासाठी निर्णय घेत आहेत. देशात मोदी यांच्या नेतृत्वाखाली विविध योजनांच्या माध्यमातून २५ कोटींपेक्षा अधिक नागरिकांना दारिद्र्य रेषेतून बाहेर काढण्याचे काम केले आहे.

भारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक, जनरल कामगार युनियन (रजि.) या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अनुप मोरे यांनी स्वागत करताना सांगितले की, ही संघटना पक्षाच्या ध्येय धोरणानुसार २०१४ मध्ये स्थापन केली आहे. या माथाडी युनियन चे महाराष्ट्रात १५ हजार सदस्य सभासद झाले आहेत. आहेत. २०२९ मध्ये राज्यात आणि देशात भाजपची सत्ता आणण्यासाठी माथाडी युनियनचे ५० हजार सभासद नोंदणीचे ध्येय ठेवून काम करीत आहे असे वचन अनुप मोरे यांनी कामगारांच्या साक्षीने महाराष्ट्र भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना दिले तसेच राज्यात आणि केंद्रात भाजपची सत्ता येण्यासाठी कामगारांनी तुम्ही आमच्या पाठीशी राहावे असे कामगारांना आवाहन केले. कामगारांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरवू कसा शब्द दिला. नेत्यांनी मला प्रदेश पातळीवर काम करण्याची संधी दिली याचे सोने करून कामगारांच्या न्यायासाठी लढत राहू असेही अनुप मोरे म्हणाले.

प्रास्ताविक ॲड. विजय हरगुडे, सूत्रसंचालन अक्षय मोरे आभार संतोष कांबळे यांनी मानले.

# DYPIMED's "Utkarsh 2026" Creates a Vibrant Beginning for New MBA and MCA Students

**MahaEnews** | PIMPRI-CHINCHWAD

**Dr. D.Y. Patil Institute of Management and Entrepreneur Development (DYPIMED), Varale, Pune, successfully organized its Induction Programme 2026 – "Utkarsh 2026" for the newly admitted MBA and MCA students from 9th to 24th September 2026. The six-day programme offered students a comprehensive introduction to the institute, academic environment, faculty, placement opportunities, industry expectations, and campus life through a thoughtfully curated blend of academic, interactive, experiential, creative, and cultural activities.**



The programme began with Registration, Saraswati Puja and Vidyapeeth Geet, followed by institute orientation. Dr. Ravi Chourasiya introduced the MBA students to the institute and its academic environment, while Dr. Ashwini Chavan, HoD – MCA, welcomed and oriented the MCA students. Dr. Meghana Bhilare, Director, DYPIMED, addressed the students and encouraged them to actively engage with the opportunities available throughout their academic journey.

A strong focus was placed on academic orientation, professional development and career preparedness. Ms. Kalyani Kulkarni conducted a session on positive habits, discipline, mindset and personal growth. Industry perspectives were shared by Mr. Ravinder Pal Singh, Director – Software Engineering, Amdocs, and Ms. Rati Choundawar, VP – People & Culture, who addressed key areas including team building, recruitment, employer branding, conflict management and learning and development. Dr. Sushil Kulkarni, T&P Officer, DYPIMED, provided students with insights into placement opportunities and career preparation. Academic sessions led by Dr. Rajesh Kumar Jha, Dr. Ashwini Chavan, Prof. Manoj Patil and Prof. Ajinkya Ban helped students understand the curriculum, syllabus and elective selection process.

The programme also fostered interaction and team spirit through faculty introductions, ice-breaking activities, outdoor team-building exercises led by Mr. Pravin Awate, and the "SPARK – Building Connections, Creating Memories" activity conducted by Ms. Srushti Jadhav, Mr. Yash Patel and Mr. Harshal Morkhade. A hands-on Ganpati Idol Making Workshop added a creative and collaborative dimension to the induction, encouraging students to participate, work together and express their creativity.

Entrepreneurship and leadership were highlighted through sessions by Mr. Sajin Sudhakaran, Director, SilverHorse India Pvt. Ltd., on developing an entrepreneurial mindset, and Mr. Jitendra Tanna, who shared practical insights on entrepreneurship, business leadership and professional life through "Journey Beyond Academics." Mr. Rahul Nalawade, Motivational Speaker and Corporate Trainer, conducted "The CEO of Swarajya: Management Lessons from Shivaji Maharaj," connecting the leadership, strategic thinking and administrative practices of Chhatrapati Shivaji Maharaj with contemporary management concepts.

The programme also addressed emerging professional concerns through "Hackers vs. Defenders: The Cybersecurity Battle," conducted by Mr. Vinit Beri, Information and Cyber Security Consultant. The session created awareness about cyber threats, digital safety and responsible digital practices. Adding a cultural dimension to the programme, Mr. Shreyash Deshpande, Director and Cultural Head, conducted an engaging session on music, creativity and expression.

Overall, "Utkarsh 2026" provided a meaningful and engaging start to the MBA and MCA students' journey at DYPIMED. By bringing together academic orientation, industry interaction, career guidance, leadership, entrepreneurship, teamwork, creativity, cybersecurity awareness and cultural learning, the programme created a vibrant platform for students to Connect, Learn, Participate and Grow, laying a strong foundation for their academic and professional journey.

# DYPCOE Badminton Team Clinches Gold Medal for Second Consecutive Year

**MahaEnews** | PIMPRI-CHINCHWAD

**The Men's Badminton Team of D. Y. Patil College of Engineering, Akurdi (DYPCOE) has once again brought glory to the institution by securing the Gold Medal for the second consecutive year at the Savitribai Phule Pune University (SPPU) Inter-College Badminton Tournament, held on 22nd September 2026 at PCCOE, Nigdi, Pune.**




With excellent teamwork, determination, discipline, and a strong fighting spirit, the DYPCOE team successfully defended its championship title and continued its impressive winning streak. The team received guidance and support from Director of Physical Education and Sports – Dr. Abaji S. Mane, whose efforts towards sports development, team preparation, and overall guidance contributed to the team's successful performance. The management and college administration congratulated the players for their remarkable achievement and appreciated their efforts in bringing pride and recognition to DYPCOE.

## Winning Team

- Ashutosh Mekale – IT
- Harshwardhan Tambare – Civil Engineering
- Soham Khilare – IT
- Hrishikesh Jaydeokar – ENTC
- Harsh Deshmukh – IT